# एमएमआरसी कार्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेचे संचालन करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा समारोप पार पडला. यावेळी कॉलनीचे लेखक सिद्धार्थ पारधे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. पारधे यांनी जीवनातील अनुभव सांगताना आत्मचरित्र लिहिण्यास कशामुळे प्रोत्साहन मिळाले याची चर्चा केली.

कॉलनी या पुस्तकात वांद्रे येथील प्रसिद्ध साहित्य सहवास कॉलनी बांधत असताना सुरक्षारक्षक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीचा मुलगा होता. सिद्धार्थ यांना त्यांच्या अशिक्षित पालकांनी अभ्यासासाठी प्रवृत्त केले आणि मराठी साहित्यातील व्यक्तिमत्त्वांनी त्यांचे मार्गदर्शन केले. सामाजिक अडथळ्यांच्या पलीकडे जाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या व्यक्तीची कथा आहे. सिद्धार्थ पारधे लिखित कॉलनी या आत्मचरित्राला २००९ साली केशवराव कोठावळे पुरस्कार मिळाला होता.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये मराठी आणि अमराठी भाषिक कर्मचाऱ्यांच्या उत्साही सहभागाबद्दल कौतुक करतो, असे एमएमआरसीएलचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी स्पष्ट केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त १४ ते २८ जानेवारी दरम्यान मराठी निबंध लेखन, काव्य स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, प्रश्नमंजुषा, शुद्ध लेखन, शब्दकोडे आणि अभिवाचन स्पर्धा आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये केवळ एमएमआरसीच्या कर्मचाऱ्यांनीच नव्हे तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.